विशेष दिवाणी दावा क्र. ३६/२०२५
**शशीकला वि. सुरेखा**
**नि.क्र. २५ पुढे**

<u>वादीचा पुढील सरतपास वकिल श्री. खंते मार्फत शपथेवर सुरू</u>

१. माझे शपथपत्रातील मजकुर माझे सांगण्याप्रमाणे लिहीण्यात आला असून तो मी वाचून पहिला आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

२. मी प्रकरणात दस्तऐवज यादी नि. २४अ लगत दस्तऐवज दाखल केलेले आहेत. मी प्रतिवादी क्र. २ च्या हक्कात असलेले दिनांक ०५.०३.२०१० रोजी खरेदीखताची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे. सदर खरेदीखत प्रतिवादीचे विधीज्ञ यांना मान्य असल्याने त्यास **नि. २८** देण्यात येते. तसेच मी प्रकरणात माझे लग्नाचे विवाहज्ञापनची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. सदर दस्ताला निशाणी देण्यास प्रतिवादीचे विधीज्ञ यांनी हरकत घेतली की, सदर दस्त ज्या विभागाने जारी केले आहे त्यांच्या साक्षशिवाय सदर दस्तास निशाणी देता येणार नाही. येथे नमुद करणे गरजेचे आहे सदर दस्त हा प्रमाणीत दस्त असुन त्यावर विवाह निबंधक यांची सही व शिक्का आहे. त्यामुळे सदर दस्ताला निशाणी देण्यास कोणताही कायदेशीर अडथळा नाही. सदर दस्ताला **नि. २९** देण्यात येते व सदर हरकत रद्द करण्यात येते. तसेच मी राष्ट्रीय कुंटुब नियोजन अंतर्गत दिलेल्या प्रमाणप्रत्राची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यास <u>आर्टीकल अ</u> देण्यात येते. तसेच मी प्रतिवादी क्र. ४ च्या लग्नाची पत्रीका दाखल केली आहे. त्यास <u>आर्टीकल ब</u> देण्यात येते. तसेच इतर दोन लग्नपत्रीका दाखल केली आहे. त्यास <u>आर्टीकल क व ड</u> देण्यात येते. तसेच प्रकरणात अधिक्षक कौटुंबिक न्यायालय यांनी दिलेले ओळखपत्र दाखल केले आहे. त्यास **नि. ३०** देण्यात येते. मी शेत गट क्र. ४३७/२ सात बारा उतारा दाखल केला आहे. त्यास **नि. ३१** देण्यात येते. तसेच दावा मिळकतीचा जुना क्र. ५५४ चा सात बारा उतारा दाखल केला आहे. त्यास **नि. ३२** देण्यात येते. तसेच गाव नमुना

८अ दाखल केला आहे. त्यास **नि. ३३** देण्यात येते. तसेच दोन्ही दावा मिळकतीचा अधिकार अभिलेख पंजी दाखल केली आहे. त्यास अनुक्रमे **नि. ३४ व ३५** देण्यात येते. मी दिनांक २१.१०.२०२० रोजी प्रतिवादी यांना माझे विधीज्ञ मार्फत नोटीस पाठवली होती त्या नोटीसची स्थळप्रत अभिलेखावर दाखल केली आहे. ती नोटीस आता मला दाखवली. त्यावर विधीज्ञ श्री. एस. ए. काळे यांची सही आहे. सदर सही मी ओळखते. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि. ३६** देण्यात येते. पोस्टाच्या चार पावत्या दाखल केलया आहेत. त्यास अनुक्रमे **नि. ३७ ते ४०** देण्यात येते. तसेच ३ पोचपावत्या दाखल केल्या आहेत. त्यांना अनुक्रमे **नि. ४१ ते ४३** देण्यात येते. तसेच मी दावा क्र. एम.सी.ए. नं. ११/२०११ मध्ये झालेल्या तडजोड नाम्याची प्रमाणीतप्रत दाखल केली आहे. त्यास **नि. ४४** देण्यात येते.

**मध्यांन्नामुळे सरतपास तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

( एम.झेड.ए.ए.क्यु.कुरैशी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर.,
काटोल

दिनांकः३०.०९.२०२५

**मध्यांन्नामुळे सरतपास विधीज्ञ श्री. खंते यांचेमार्फत शपथेवर पुढे सुरू**

३. मी प्रकरणात एकलव्य ज्ञानवर्धीनी बहोउद्दीशय संस्था नागपूर घेण्यात आलेल्या ज्ञानवर्धन उपक्रमचे मुळ प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. सदर दस्ताला स्टॅम्प नसल्याने सदर दस्ताला निशाणी देण्यास प्रतिवादीची वकिलाने हरकत घेतले. सदर दस्ताचे अवलोकन केले. त्यावरून असे दिसुन येते की, सदर दस्त जरी मुळ स्वरूपात असले तरी त्यावर संस्थेचा शिक्का नाही. त्यामुळे सदर दस्ताला आर्टीकल इ देण्यात येते. तसेच माझया मुलांचे प्रगतीपत्र एकुण ११ दाखल केले आहेत. त्यांना एकत्रितरित्या **नि. ४५ ए ते नि. ४५ के** देण्यात येते. तसेच मी

दावा मिळकतीचा बंदोबस्त नकाशाची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **नि. ४६** देण्यात येते व एकत्रीकरण नकाशाची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **नि. ४७** देण्यात येते. एकत्रीकरण पुस्तीका दाखल केली आहे. त्यास **नि. ४८** देण्यात येते. दावा मिळकतीचा दुरूस्ती नमुना दाखल केला आहे. त्यास **नि. ४९** देण्यात येते. हिस्सा फॉर्म नं. ४ ची प्रमाणीत प्रती दाखल केली आहे. त्यास **नि. ५० व ५१** देण्यात येते. रिनंबरींगची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **नि. ५२** देण्यात येते. दावा मिळकतीची एकत्रीकरण शिट प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **नि. ५३** देण्यात येते. तसेच दुसरे दावा मिळकतीची एकत्रीकरण शिट प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **नि. ५४** देण्यात येते. तसेच मी दावा मिळकतीचा दुसरा बंदोबस्त नकाशाची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **नि. ५५** देण्यात येते. दुरूस्ती नमुन्याची प्रमाणीत प्रतीला **नि. ५६** देण्यात येते. शेताची पुस्तीकाला **नि. ५७** देण्यात येते. हिस्सा फॉर्म नं. ४ ला **नि. ५८ व नि. ५९** देण्यात येते. एकत्रीकरणाची शिटला **नि. ६०** देण्यात येते. तसेच माझे निवडणुक आयोगाचे ओळखपत्राची प्रत व इतर दोन पडताळणी प्रत आधार कार्डच्या प्रती दाखल केल्या आहेत. त्यास **नि. ६२ ते ६४** देण्यात येतात.

प्रतिवादीचे वकिल श्री. विकास भोयर यांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

( एम.झेड.ए.ए.क्यु.कुरैशी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर.,
काटोल

दिनांकः३०.०९.२०२५